


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
dainiklokaarambh@gmail.com
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार १८ डिसेंबर २०२४ | अंक९● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

# अर्थखातं अजितदादांकडे, महसूल फडणवीसांकडे अन गृहमंत्रालय?

## अखेर खातेवाटपाचा फॉर्म्युला ठरला!



महाराष्ट्रात सध्या राजकीय घडामोडी वेगाने सुरु आहेत. काही दिवसांपूर्वी महायुती सरकारचा पहिला मंत्रिमंडळ विस्तार पार पडला. यावेळी महायुतीच्या ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली. यात ३३ कॅबिनेट मंत्री तर ६ राज्य मंत्र्यांचा समावेश आहे. यात भाजपचे १९ मंत्री, शिवसेनेचे ११ आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या ९ मंत्र्यांचा समावेश आहे. महायुतीच्या पहिल्या मंत्रिमंडळ विस्तारात अनेक नवीन चेह-यांना संधी देण्यात आली. तर काही माजी मंत्र्यांना डच्चू देण्यात आला. यामुळे काही आमदार नाराज झाले आहेत. तर दुसरीकडे गेल्या काही दिवसांपासून प्रतिक्षेत असलेल्या खातेवाटपाचे सूत्र अखेर ठरले आहे.
महायुतीच्या मंत्रिमंडळ विस्तारात मंत्रिपद न मिळाल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यातच महायुतीचा मंत्रिमंडळ विस्तार होऊन तीन दिवस उलटून गेले आहेत. तरी अद्याप खातेवाटप झाले नसल्याने अनेकांचे लक्ष त्याकडे लागले होते. मंत्रिपदाची शपथ घेतलेल्या ३९ मंत्र्यांना खातेवाटप कधी होणार, असा प्रश्न सातत्याने उपस्थितीत केला जात होता. खातेवाटपावरुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी सातत्याने खलबतं सुरु होती. तसेच कोणाला कोणते खाते मिळणार? यासाठी रस्सीखेंच पाहायला मिळत होती.

### महायुतीच्या खातेवाटपावर २४ तासात शिक्कामोर्तब

मिळालेल्या माहितीनुसार, येत्या २४ तासात महायुतीच्या खातेवाटपावर अंतिम शिक्कामोर्तब होणार आहे. शिवसेनेच्या कोणत्या मंत्र्यांना कोणती खाती दिली जाणार याची यादी आज रात्रीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिली जाणार आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे अंतिम खातेवाटपाची यादीही आज किंवा उद्यापर्यंत दिली जाईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे महायुतीचा खातेवाटपचा फॉर्म्युला अखेर ठरल्याचे बोललं जात आहे.

## ओडिसा,भुवनेश्वर येथे होणा-या ऑल इंडिया दक्षिण - पश्चिम झोनल योगासन स्पर्धेसाठी महाविद्यालयाचा कु.सचिन मोहिते ची निवड



गेवराई, दि. १६, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,जालना येथे झालेल्या आंतर - महाविद्यालयीन योगासन स्पर्धेत र.भ अट्टल महाविद्यालयाचा खेळाडू सचिन ने सिल्वर मेडल पटकावले तसेच पुढे किट युनिव्हर्सिटी भुवनेश्वर,ओडिसा येथे होणा-या ऑल इंडिया दक्षिण -पश्चिम झोन योगासन स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अमरसिंह पंडित, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य आणि प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांनी अभिनंदन केले. तसेच पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.यावेळी उपप्राचार्य मेजर डॉ. विजय सांगळे, डॉ. प्रशांत पांगरीकर, वरिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा विभागप्रमुख, प्रा. अरुण भराडे, प्रा. रवींद्र खरात, प्रा. अमित फुलारे, प्रा. राजेंद्र बरकसे आदींची उपस्थिती होती.

## गेवराईचा सुपूत्र असलम बागबान निर्मित ययाति नाटक बंगळुरू आंतरराष्ट्रीय कलामंचावर




गेवराई - दि . १७ (प्रतिनिधी ) -बागबान थिएटर ग्रूप गेवराई , गिरीश कर्नाड लिखित आणि असलम शेख दिग्दर्शित ङ्मययातिङ्ग नाटक राष्ट्रीय नाट्य विद्यालय नवी दिल्ली अंतर्गत २८ जानेवारी ते १६ फेब्रुवारी दरम्यान देशभरात सादर होणा-या भारंगम (भारतीय रंग महोत्सव) या आंतरराष्ट्रीय महोत्सवात ७ फेब्रुवारी २०२५ रोजी बंगळूर येथे सादर होणार आहे. राष्ट्रीय नाट्य विद्यालय नवी दिल्ली हे दरवर्षी भारंगम या नाट्य महोत्सवाचे आयोजन करीत असते. या नाट्य महोत्सवा महाराष्ट्रासह देश आणि परदेशातून नाटके होत असल्याने याचे एक वेगळे प्रस्थ बनलेले आहे. संपूर्ण भारत देशातील निवडक नाटकांसोबतच खालील देशांचे सादरीकरण होणार आहे - या आंतरराष्ट्रीय महोत्सवात जर्मनी, तैवान, श्रीलंका, पोलंड, ऑस्ट्रिया, झेक रिपब्लिक या देशांतील कलाकारांचे देखील सादरीकरण होणार आहे. गेवराईचे असला बागबान यांनी अभिनित व दिग्दर्शित केलेल्या ययाति या नाटकात शुभम कोल्हे, प्रेरणा खरात, श्वेता गणगे, विशाखा शिरवाडकर, उल्का कुलकर्णी, ऋषिकेश कारके, संकेत बलांडे, किशोर थोरात आदी कलाकारांचा अभिनय पाहायला मिळणार तर डॉ. गजानन दांडगे, डॉ.व्ही. सौम्यश्री, रामेश्वर देवरे, विनोद आघाव, रावबा गजमल , आदित्य इंगळे, वाल्मीक जाधव, भाग्यरवी कुलकर्णी, कविता दिवेकर, रोहिदास सोमवंशी, पांडुरंग शिंगारे, बाळू बटुळे आदी कलाकार तांत्रिक बाजू सांभाळणार आहेत. गेवराई व बीड जिल्हयासाठी अभिमानाची बाब आहे .

## जिल्ह्याची कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती गंभीर!

### लोकशाहीचा अस्त आणि हुकूमशाहीचा उदय झालाय का? जनतेसमोर मोठा प्रश्न -राजेभाऊ फड



परळी वैजनाथ । प्रतिनिधी गुंडगिरी, दादागिरी, चोऱ्या, माऱ्या, हत्या आणि अपहरण अशा गोष्टी बीड जिल्ह्यात नित्याच्याच झाल्या आहेत. जिल्हाभरात रोजच काही ना काही अप्रिय घटना घडत आहेत. अपप्रवृत्तीच्या धेंडांना कायद्याची आणि पोलीस यंत्रणेची अजिबात भीती राहिलेली नाही. अत्यंत सुसंस्कृत जिल्हा असलेल्या बीड जिल्ह्याची वाईट अवस्था मागील काही दिवसांत होऊन बसली आहे. येथील लोकशाही संपुष्टात आली असून गुंडगिरी आणि दादागिरीचा उदय झालेला पहायला मिळत आहे. ही स्थिती गंभीर आणि भीतीदायक असून, जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था सुरळीत व्हावी यासाठी ठोस उपाययोजना शासन आणि प्रशासनाकडून केल्या जाणे अत्यंत आवश्यक असून, नवनियुक्त मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी बीड जिल्ह्यावर विशेष लक्ष केंद्रित करावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. बीड जिल्ह्यात मागील काही दिवसांत घडलेल्या घटना अत्यंत वाईट आहेत. मस्साजोग येथील सरपंच पती संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली. परळी वैजनाथ येथील व्यापारी अमोल डूबे यांचे अपहरण करून त्यांना मारहाण करण्यात आली आणि खंडणी मागण्यात आली. जिल्ह्यात कोठे खून होत आहेत, कोठे गंभीर चोऱ्या, गोळीबार, खंडणी मागण्याचे प्रकार तर सर्रास होत आहेत.



### वसा जनसेवेचा वारसा विकासाचा....

भाजपाचे गेवराई विधानसभा मतदारसंघाचे युवानेते माननीय शिवराज बाळराजे पवार यांनी गेवराई शहरात चालू असलेल्या विविध विकास कामापैकी ताकडगांव रोड ते घाटूळ नाना तसेच बंडू पवार ते रमेश नवले व सेंट झेविअर्स बोर्ड ते सेंट झेविअर्स गेट पर्यंत च्या ७२२७६७६.०० रुपये डांबरीकरण रोडच्या कामाची पाहणी केली.

## पात्र महिला खेळाडूंना प्रशासनात थेट नियुक्ती द्या

### खा. सोनवणेंनी केंद्रीय क्रीडा मंत्र्यांची भेट घेत मांडला मुद्दा

बीड दि.१६ (प्रतिनिधी): स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया अंतर्गत सलग तीन वर्षे राष्ट्रीय पातळीवर खेळलेल्या महिला खेळाडूंना थेट वर्ग एक पदी नियुक्ती देण्यात येत असे. परंतु मागील दहा वर्षात अशी नियुक्ती दिलेली नाही. यापुढे लाडली बहन म्हणून पात्र महिला खेळाडूंना प्रशासनात थेट नियुक्ती द्यावी, अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी मनसुख मांडविया, केंद्रीय क्रीडा मंत्री व रक्षा खडसे, क्रीडा राज्यमंत्री यांना निवेदनाव्दारे केली आहे.
केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया, आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांना भेटून दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया, भारत सरकार अंतर्गत राष्ट्रीय पातळीवरील सलग तीन वर्ष फुटबॉल खेळलेल्या महिला खेळाडू राज्यांचे व देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मोठ्या मेहनतीने खेळतात. या महिला खेळाडूंच्या योगदानाला मान्यता मिळावी आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी लाडली बहन खेळाडू म्हणून पावले उचलण्याची आवश्यकता आहे.त्या अनुषंगाने, सलग तीन वर्षे



राष्ट्रीय पातळीवर खेळलेल्या महिला खेळाडूंच्या लाडली बहन म्हणून थेट भरतीसाठी धोरण तयार करावे. केंद्रीय किंवा राज्य सरकारमध्ये त्यांना वर्ग-१ च्या नोक-या देऊन त्यांच्या मेहनतीला योग्य न्याय द्यावा, यामुळे त्यांच्या योगदानाचा सन्मान होईल. तसेच भविष्यात अधिकाधिक महिला खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी प्रेरणा मिळेल. यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घ्यावा आणि त्याची तातडीने अंमलबजावणी करावी, असेही म्हटले आहे. यावेळी राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी ही मागणी अतिशय चांगली असून आपण लवकरच याबाबत निर्णय घेवू, असे आश्वासन देखील दिले. एकट्या बीड जिल्ह्यात राष्ट्रीय पातळीवर सलग तीन वर्षे खेळलेल्या खेळाडूंची संख्या ५० च्या घरात आहे. खा. सोनवणे यांनी केलेल्या मागणीनुसार निर्णय झाल्यास देशातील लाडक्या बहिनींना
याचा मोठा फायदा होणार आहे

## पश्चिम झोन आंतर - विद्यापीठ हॉलीबॉल स्पर्धेसाठी महाविद्यालयाचा कु.अभिषेक फुलारे ची निवड



गेवराई, दि. १६,आंतर - महाविद्यालयीन हॉलीबॉल स्पर्धेत र.भ अट्टल महाविद्यालयाचा खेळाडू अभिषेक फुलारे ची डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा युनिव्हर्सिटी,छत्रपती संभाजीनगर हॉलीबॉल च्या संघात निवड झाल्याबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अमरसिंह पंडित, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य आणि प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांनी अभिनंदन केले. तसेच पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.यावेळी उपप्राचार्य मेजर डॉ. विजय सांगळे, डॉ. प्रशांत पांगरीकर, वरिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा विभागप्रमुख, प्रा. अरुण भराडे, हॉलीबॉल प्रशिक्षक. विजय अपसिंगेकर,
प्रा. रवींद्र खरात, प्रा. अमित फुलारे, आदींची उपस्थिती होती.
गेल्या वर्षी १२१ दशलक्ष ( ) १२.१ कोटी ) गैर उपनगरीय प्रवाशांनी वाहतूक केली होती. यंदाची आकडेवारी पाहता यात ५.६१% वाढ झाली आहे.

## घाटनांदूर येथे रेल्वे गाड्या थांबवा

### खा.बजरंग सोनवणेंनी दिले रेल्वे बोर्ड अध्यक्षांना निवेदन



**बीड/प्रतिनिधी**
जिल्ह्यातील घाटनांदूर रेल्वे स्थानक, सामान्य प्रवाशी आणि मालवाहतूक करण्यासाठी महत्वाचे स्थानक आहे. परंतू या रेल्वे स्थानकावर गेल्या काही दिवसांपासून रेल्वे गाड्या थांबविणे बंद झाले आहे.परिणामी घाटनांदूर भागातील नागरिकांना रेल्वे स्थानक असताना देखील फायदा होत नाही.त्यामुळे घाटनांदूर मार्गावरुन धावणाऱ्या रेल्वे थांबविण्यात याव्यात, आशा मागणीचे निवेदन खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे बोर्डाचे केंद्रीय अध्यक्ष सतीश कुमार, रेल्वेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिल्ली येथे भेट घेवून सोमवार (ता.१६) रोजी दिले आहे. त्यामुळे घाटनांदूर परिसरातील जनतेची अडचण दूर होणार आहे.
अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर येथील रेल्वे स्थानक सार्वजनिक वाहतूकीसाठी परळी ते लातूर दरम्यान महत्वाचे स्थानक आहे. कोविड-१९ महामारीपूर्वी औरंगाबाद-गुंटूर आणि नांदेड-बंगलोर गाड्या नियमितपणे घाटनंदूर येथे थांबत होत्या. परंतु नंतर थांबणे थांबवले गेले. घाटनंदूर आणि त्या परिसरातील नागरिकांसाठी असुविधाजनक आहे.त्यामुळे या ठिकाणी रेल्वे गाड्या थांबविण्याच्या सूचना देण्यात याव्यात, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वे बोर्डाकडे केली.



**घाटनंदूर येथे रेल्वे स्थानकावर या गाड्या थांबविण्याची मागणी**
घाटनांदूर रेल्वे स्थानक येथे औरंगाबाद-गुंटूरः ट्रेन क्र. १७२५४, गुंटूर - औरंगाबादः ट्रेन क्र. १७२५३,बंगलोर - नांदेडः ट्रेन क्र. १६५९३, नांदेड - बंगलोरः ट्रेन क्र. १६५९४, नांदेड - पनवेलः ट्रेन क्र. १७६१४, पनवेल - नांदेडः ट्रेन क्र. १७६१३ या रेल्वे थांबविण्यात याव्यात अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली.

## सं पा द की य

### ग्रामीण जीवनमूल्यांची प्रतिकं उजागर करणारा गावगाडा काव्यसंग्रह

साहेबराव नंदन तात्या यांचा महाराष्ट्र कलावंत न्याय हक्क समिती मुंबई यांचा राज्यस्तरीय साहित्य क्रांती पुरस्कार २०२३ तसेच गिरणा गौरव प्रतिपठान नाशिक यांचा राज्यस्तरीय स्मिता पाटील शब्द पेरा पुरस्कार प्राप्त ङ गावगाडा ङ हा काव्यसंग्रह नुकताच वाचनात आला.त्यांची परिसस्पर्श कांदबरी वाचक रसिकांच्या मनात घर करून राहिली आहे.कवी साहेबराव नंदन हे चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व असून, संपादन, प्रवचन व काव्य लेखनातून सामाजिक परिवर्तनाची,बदलांची नोंद सूक्ष्म निरीक्षणातून घेण्यात यशस्वी झाले आहेत.कविता ही अंतरात्म्याची स्पंदनं टीपणारी असते ही स्पंदनं गावगाडा वाचताना प्रकर्षाने जाणवतात कवीचा जीवनपट गावात व्यथित झाला आहे ओघाने प्रत्येक कविता ही ग्रामीण जीवनमूल्यांची प्रतिकं ठसठशीत करणारी आहे,जगण्यावर शतदा प्रेम करावे हे बिंबवणारीआहे.शेतशिवारी,लाल परी, स्वराज जननी,यॉड अशा अपवादात्मक कविता जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे होणार्या वर्तमानातील विध्वंसक वृत्ती प्रतिबिंबित करणार्या आहेत ,कालोघात परिवर्तन होणे स्वाभाविक आहे परंतु मायमातीशी फारकत घेऊन सामाजिक व कौटुंबिक संबंध अधिक गुंतागुंतीचे होताहेत याची खंत कवी मनाला अस्वस्थ करते. ङबहीण, ताई सिस्टर झाली इंग्रजी संस्कृती घरात आली भाऊ, दादा तो ब्रदर झाला माय माझी मदर झालीङ ब्रिटिश राजवटीचा प्रभाव आज जास्त गडद होत आहे, हे सहज होते आहे ही नोंद घेण्याजोगी बाब नाही, परंतु हे होणारच असं म्हणणं घातक आहे हे कवी सहज सोप्या भाषेत सांगून जातो ङगावगाडाङ ह्या शीर्षक असलेल्या कवितेतून सामाजिक बदलांमुळे जीवन जगण्याचा अर्थ बदलला, जीवनशैली बदलली याची बोचणी कवी मांडतो, ङगावाच्या मध्यभागी पार होता त्या पारावर किर्तन होई सारा गाव हरिनाम गाईङ एकत्र कुटुंबपद्धतीत नातीगोती जोपासली जातं होती, वर्तन व्यवहारातून संस्कार मूल्ये शिकवली जायची. विभक्त त्रिकोणी कुटुंब व्यवस्था व पाश्चिमात्य संस्कृतीच्या नावाखाली रुजत चाललेल्या अंधानुकरणामुळे चालीरीती, रितीरिवाज, नात्यातील स्नेहभाव विरून गेला आहे,त्याची सल व्यक्त करताना कवी लिहीतो– ङकुणी कुणा पुसत नाही माझं घर माझीच आई आईवडील धक्का खाई सारंच इपरीत घडत राहीङ ग्रामीण जीवनातील अविभाज्य भाग असणार्या अनेक गोष्टी, रूढी परंपरा, प्रथा सणसोहळे, मोडीत निघालेत, जत्रा, तमाशा, भावकी,आठवडे बाजार, भजन कीर्तन, प्रभाव फेरी मधून संस्कार मूल्ये, आध्यात्मिक जागर होत होता.आपूलकी, स्नेहभाव ,नात्याची वीण घट्ट होत होती ह्या सर्व गोष्टींचा धांडोळा प्रस्तुत काव्यसंग्रहात आला आहे, या अनुषंगाने कवीच्या अनुभवाचा व्यापक कॅनव्हास लक्षात येतो .तसेच आपल्या लोकभावना जनसामान्यांच्या मनात पोहचविण्यात साहेबराव नंदन यशस्वी झाले आहेत . भावकी ही समाजाला लागलेली किड अनंत– अनादी काळापासून तर विद्यमान राजकीय क्षेत्रातली भाऊबंदकी संपूर्ण समाज वेठीस धरत आहे . भावकीचे वाटणी,शेती, घरातील हिस्सा विषयक वाद ङभावकीङ कवितेतून व्यक्त करतांनाच्या ह्या मनाला स्पर्शणार्या पंक्ती ङभावकीतील प्रेम जिव्हाळा आता दिसत नाही खळवाडीच्या भांडणापाई भावकी दूर दूर जाईङ वारकरी संप्रदायाचा प्रभाव असूनही कवी विज्ञानयुगातील संसाधने वापराचा अट्टाहास धरतो व पुरोगामी विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी सडेतोड भूमिका घेतो दैववादाचे खंडन करताना ङदैवङ कवितेत आपले परखड मत मांडताना, ङअरे अरे माणसा दैवाधिन राहू नको कर्म धर्माची संगत भाळी दैवत पाहु नकोङ कर्मसिंध्दांताचे माहात्म्य सांगतानाच धर्मकांड व थोतांडात माणूस वेठीस धरला जातोय म्हणूनच माणसातला देव कुठे हरवला? असा उद्वीग्न प्रश्न कवी नंदन ढासठणार्या समाज व्यवस्थेला विचारतात . गावगाडा हा पहिलाच काव्यसंग्रह असूनही भाषिक व साहित्यिक अंगाने उजवा ठरला आहे तत्कालीन ग्रामीण भाषेचा अस्सल बाज हे संग्रहाच सौंदर्य स्थळं म्हणता येईल,सहज ओघवती बोली, साध्यासुध्या शब्दांचा नेमस्त वापर. योग्य प्रतिक , उपमा समायोजित प्रतिमा यांचा मिलाफ साधून गावगाडा हा काव्यसंग्रह वाचकांना संकर्षित करणारा ठरला आहे ,या पुष्ट्यर्थ काही ओळी उद्धृत करीत आहे. ङलाजा होम लाल झेंडा,वाजला सन ई चौघडा मंत्रोच्चारी पडल्या अक्षदा,धरे करवली डोईघडाङ ङखेळ पाळणा,कुव्वा मौत का,नाचे मदारीचे माकड आई माझी घेण्या जाई, रंगीत मलमल कापडङ खेडूत जीवनशैलीचे यथार्थ वर्णन करताना आधुनिकतेच्या भडिमाराने बिघडलेली गृह संस्कृती पूर्ववत व्हावी हा आशावाद कवी व्यक्त करतो . माय माहेर,लेकलाडकी, माय, भावकी,बाप ढसा ढसा रडला, अनाथांची माय,माई,मायमाहेर आदी कवीतेतून उसवत चाललेल्या नात्यांची वीण तळमळीने व्यक्त केली आहे म्हणूनच ङजून्या नव्यांचा काळजातील ठाव घेणारा कवी अशा समर्पक शब्दांत कवी सोमदत्त मुंजवाडकर यांनी गावगाडाची पाठराखण केली आहे मानवी वर्तनाला जगणे शिकवणारी कविता म्हणजे गावगाडा अशा लक्षवेधी प्रस्तावनेमुळे संग्रहाची उंची वाढवली आहे तान्हाजी खोडे यांनी. चित्रकार विष्णू थोरे यांचे मुखपृष्ठ आशयसंपन्न संकर्षित करणारे आहे, एकूण ४८ कवितांचा हा छोटासा वाचनीय संग्रह आहे. ज्ञानसिंधू प्रकाशनाने सुबक मांडणी व वाचनीय टाईप सेंटीग असलेला काव्यसंग्रह वाचकांना उपलब्ध करून दिला आहे

# दिल्लीच्या शिरपेचात मानाचा तुरा

### ९८ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनात दिल्ली येथे कवी कट्ट्यासाठी कवी ॲड. उमाकांत आदमाने यांच्या शोध या कवितेची सलग चौथ्यांदा निवड..

पुणे, तब्बल ७० वर्षानी दिल्ली मध्ये पुन्हा एकदा वाजणार मराठी भाषेचा डंका, सरहद पुणे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात दिल्ली येथे होणा–या कविकट्टा काव्यमंचावर कवी, साहित्यिक, निवेदक ॲड. उमाकांत मधुकर आदमाने, यांची तालकटोरा स्टेडीयम, नवी दिल्ली ११०००४ येथे दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या कविकट्टा काव्यमंचावर वारजे, पुणे येथील कवी, साहित्यिक, निवेदक ॲड. उमाकांत मधुकर आदमाने यांच्या (शीर्षक : शोध) या कवितेची निवड करण्यात आली, या अगोदर कवी, साहित्यिक, निवेदक ॲड. उमाकांत मधुकर आदमाने यांनी ९५, ९६ व ९७ वे अ.भा.मराठी साहित्य संमेलनात अनुक्रमे ङसांग मी काय करूफ, ङनुसत्या तुझ्या असण्याने,फ ङमन पाखरूफ अदी विषयावर कविता सादर करून महाराष्ट्रातील सर्व कवी रसिकांना आपल्या कवितेतून मंत्रमुग्ध केले आहे, त्यामुळेच यंदाही ९८ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनात कवी कट्ट्यासाठी कवी, साहित्यिक, निवेदक ॲड. उमाकांत मधुकर आदमाने यांची सलग चौथ्यांदा निवड करण्यात आलेली आहे. दिल्ली येथील सरहद पुणे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळ तालकटोरा स्टेडीयम, नवी दिल्ली ११०००४ येथे दिनांक २१, २२, व २३ फेब्रुवारी २०२५ दरम्यान होणार असून संमेलनात परिसंवाद, प्रकट मुलाखत, कविसंमेलन आदी कार्यक्रमांची मेजवानी साहित्यप्रेमींना मिळणार आहे. लोकसाहित्य व लोकसंस्कृतीच्या ज्येष्ठ अभ्यासक मा. डॉ. तारा भवाळकर संमेलना अध्यक्षपदी असून स्वागताध्यक्ष मा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब असणार आहेत, उद्धघाटनासाठी देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी उपस्थित असणार आहेत, कारण तब्बल ७० वर्षानी दिल्ली मध्ये पुन्हा एकदा वाजणार मराठी भाषेचा डंका, मराठी भाषेला मिळणार अभिजात दर्जा...

कवी ॲड. उमाकांत मधुकर आदमाने मूळ गाव बोरगाव काळे, जिल्हा लातूर परंतु सध्या स्थायिक पुणे येथून विविध सामाजिक, शैक्षणिक, व साहित्यिक चळवळीत सक्रीय कार्य सतत करत असतात, सुप्रसिद्ध कवी, साहित्यिक, निवेदक ॲड. उमाकांत मधुकर आदमाने यांची कविता शीर्षक ङशोधफ तिच्या अस्तित्वाचा कवितेची कवीकट्ट्यासाठी दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी या दरम्यान सादर करणार आहेत, कवी, साहित्यिक, निवेदक ॲड. उमाकांत मधुकर आदमाने हे सन २००९ पासून शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालय, पुणे येथे वकीली व्यवसाय करीत असून सन २०२० मध्ये त्यांची भारत सरकार नोटरीपदी निवड झालेली असून नोटरी व्यवसाय सुद्धा प्रामाणिक पणे करीत आहेत, वकिली व्यवसाया बरोबरच त्यांनी लॉकडाऊनच्या काळात साहित्य विश्वात यशस्वी प्रवास करत या अगोदर साहित्य क्षेत्रात ९५ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलन, उदगीर, जि. लातूर येथे शांता शेळके कवी कट्टा वर आई या विषयावरील कविता मोठ्या दिमाखात सादर केली होती, ९६ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलन, वर्धा येथे प्रा. देविदास सोटे कवी कट्टा वर नुसत्या तुझ्या असण्याने, आई या विषयावरील कविता मोठ्या दिमाखात सादर केली होती, तसेच ९७ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलन, जळगाव, अमळनेर येथे कवी गणेश कुडे कवी कट्टा वर मन पाखरू...प्रेम कविता सादर करण्याचा मला बहुमान मिळाला त्यामुळे साहित्यिक क्षेत्रात देखील आपला ठसा प्रामाणिकपणे उमटविला आहे, अनेक जिल्हास्तरीय, राजस्तरीय, राष्ट्रीय स्तरावर विविध विषयांवर पूर्ण भारत भर काव्यसंमेलनात सहभाग घेऊन त्यांनी आपल्या कविता सादर केल्या.

त्यांचे ध्येय हेच की जनसेवा हीच राष्ट्रसेवा समजून काम करणे, हे असून शैक्षणिक व सामजिक बांधिलकी या विचारातून अनेक गरजवंत विध्यार्थाना शैक्षणीक साहित्य, गणवेश वाटप करून त्यांना आधार देण्याचे काम केले आहे, तसेच ते मुळचे बोरगाव काळे, ता.जि. लातूर या गावचे सुपुत्र गावचे असून किल्लारी येथे झालेल्या भूंकपग्रस्त कुटुंबातील मुले आणि मुलींच्या सहभागातून त्यांना आर्थिक, सामाजिक, मग ती धान्य मागून त्यांच्यापर्यंत नेऊन देण्याचे काम त्यांनी घडवून आणलेले आहे, तसेच छडड च्या माध्यमातून गाव मौजे पुणे, अहमदनगर, सातारा, औरंगाबाद, सोलापुर, लातूर, सांगली, बीड, उस्मानाबाद, नांदेड, राजस्थान, बेंगलोर, केरळ येथे जाऊन दहा दिवसीय शिबिरात सहभाग घेऊन पाणी संरक्षणफङपाणी आडवा पाणी झिरवा हा संदेश सर्व महाराष्ट्रभर पसरविण्याचे आतिशय मोलाचे काम केले असले तरी त्याच बरोबर वकिली व्यवसायात देखील त्यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे.

## शेतीला पूरक व्यवसाय करा , आर्थिक उन्नती साधा : पिंपळनेर येथे बैठकीत तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे शेतक–यांना आवाहन





. मंगळवार दिनांक १७ डिसेंबर (प्रतिनिधी लोक इच्छा)रोजी पिंपळनेर मंडळाची मंडळ स्तरीय बैठक बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली . प्रभारी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीत प्रशासकीय योजना व प्रलंबित कामकाजांचा आढावा घेण्यात आला . या बैठकीला मंडळातील नागरिक , शेतकरी , मंडळ अधिकारी , तलाठी ( ग्राम महसूल अधिकारी ) , ग्रामसेवक , कृषी सहायक , बीएलओ , पोलीस पाटील , स्वस्त धान्य दुकानदार तसेच अंगणवाडी सेविका इत्यादी उपस्थित होते . यावेळी पिंपळनेर येथील सतीश भाऊ पाटील , बोरदेवी येथील रवींद्र आर्सुळ तसेच ग्रामपंचायत पिंपळनेर चे उपसरपंच जावेद शेख व सदस्य , ग्रामसेवक बाबासाहेब घुमरे , स्वस्त धान्य दुकानदार भागवत दुबाले , पोलिस पाटील आप्पासाहेब दुबाले हजर होते . सुरुवातीलाच तहसीलदारांनी सांगितले ङ तुमचे प्रश्न तुम्ही बिनधास्तपणे मांडा . आपण सगळ्यांचे प्रश्न जाणून घेऊ व त्यावर उपाय करु ङ.

सर्वसामान्य लोकांच्या अडचणी जाणून घेऊन , त्यांची प्रलंबित कामे याबद्दल सविस्तर चर्चा करून त्यावर तात्काळ कार्यवाही करावी , अशा सूचना संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या . गावक–यांनीही आपले प्रश्न गावासंबंधी असो किंवा वैयक्तिक असो बेधडकपणे मांडले आणि तहसीलदारांनी त्यांचे यथोचित समाधान केले . यातुन त्यांची कार्यतत्परता आणि लोकांविषयी असलेला कनवाळूपणा दिसून आला . बैठकीदरम्यान काही शेतक–यांनी शेतीपूरक व्यवसाय , जोडधंदे करता येतील किंवा कसे याबाबत चौकशी केली . यावर प्रत्युत्तर देताना तहसीलदार शेळके यांनी सांगितले की तुती लागवड , पशुपालन करणे , नेट शेड शेती , फार्मर प्रोड्रूसर कंपनी स्थापन करणे इत्यादी अनेक जोडधंदे अथवा व्यवसायातून स्वतःची उन्नती अथवा भरभराट करता येईल . त्यासाठी शक्य झाल्यास कृषी विभागामार्फत मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले . तदनंतर उपस्थित ग्रामपंचायत अधिकारी यांच्या कामकाजाचा आढावा घेतला . ग्रामपंचायत अधिकारी यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविल्या पाहिजेत तसेच त्यांना सोयी सुविधा पुरविल्या पाहिजेत . त्यांची सर्व कामे वेळेवर पूर्ण केली पाहिजेत . अशाही सूचना दिल्या . पिंपळनेर येथील स्मशानभूमीचा प्रश्न लोकांनी त्यांच्यासमोर मांडला . त्यानुसार म गाव तेथे स्मशानभूमी म अंतर्गत संबंधित कर्मचारी व अधिकारी यांनी गावक–यांना लवकरात लवकर जमीन उपलब्ध करून त्यांचा स्मशानभूमीचा प्रश्न मार्गी लावण्यात येईल , असे आश्वासन दिले . बैठक सुरू असतानाच नागरिकांनी आमच्या रस्त्याचा प्रश्न सोडवावा , स्मशानभूमीचा प्रश्न सोडवावा अशी विनंती केली . तहसीलदारांनाही तात्काळ मंडळाधिकारी , तलाठी यांना सूचना देऊन कोणत्याही नागरिकांची कामे प्रलंबित राहणार नाहीत , याबाबत दक्षता घ्यावी असे सूचित केले . त्यानंतर स्वस्त धान्य दुकानदार यांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला . एकही पात्र लाभार्थी रेशन मिळण्यापासून वंचित राहू नये , अशा सक्त सूचना सर्व स्वस्त धान्य दुकानदारांना शेळके यांनी दिल्या .

यानंतर उपस्थित असलेले सर्व बीएलओ यांना नवीन नाव नोंदणी संदर्भात सूचना दिल्या . मतदानस्तरीय अधिकारी ( बी एल ओ ) यांनी मतदान केंद्राबाबत , नाव वगळणी बाबत काही समस्या मांडल्या . त्यालाही तहसीलदारांनी उचित उत्तर दिले . उपविभागीय अधिकारी कविता जाधव या नेहमी शेतक–यांच्या प्रश्नाविषयी सजग असतात . सर्वांचे प्रश्न जाणून घ्या , असे त्यांचे म्हणणे असते . बैठकीत पुढे बोलताना प्रामुख्याने अनुदानापासून कोणीही पात्र शेतकरी वंचित राहू नये , तसेच सलोखा योजनेचा प्रचार , प्रसार , प्रसिद्धीकरणावर भर द्यावा , असे यावेळी तहसीलदारांनी सांगितले . मंडळ अधिकारी , तलाठी यांनी नियमानुसार जे फेरफार मंजूर करणे योग्य असतील , ते तात्काळ मंजूर करावे . कोणताही फेरफार प्रलंबित ठेवण्यात येऊ नये , नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही किंवा त्यांना असुविधा होणार नाही यासाठी प्रयत्नशील राहावे , असेही आवाहन केले . सर्व ग्राम महसूल अधिकारी यांच्या वतीने बोलताना मंडळ अधिकारी सचिन सानप यांनी आश्वासन दिले की मंडळातील नागरिकांची अथवा शेतक–यांची कोणतीही कामे , रस्त्याची कामे अथवा इतर कामे प्रलंबित राहणार नाहीत याबाबत पूर्णतः दक्षता घेण्यात येईल .

तहसीलदार शेळके यांनी ग्रामीण भागात स्वतः येऊन शेतक–यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या व त्यावर उपाययोजना केल्या , याबद्दल सर्वसामान्य जनतेने समाधान व्यक्त केले .

यावेळी पिंपळनेर मंडळाचे मंडळ अधिकारी सचिन सानप, पिंपळनेर , सूर्डी (थोट) सजेच्या ग्राम महसूल अधिकारी मोहिनी म सवले , नाथापुर , लोणी (शाह) सजेचे ग्राम महसूल अधिकारी हरिदास काकडे , सांडरवण सजेच्या ग्राम महसूल अधिकारी वनिता इंगळे , पिंपळादेवी सजेचे ग्राम महसूल अधिकारी ओमसाई सोनवणे , मंडळातील कृषी सहाय्यक , पोलीस पाटील व ग्रामसेवक इत्यादी उपस्थित होते .

बैठक संपन्न झाल्यावर तहसीलदार शेळके यांनी पिंपळनेर येथील गट नंबर ३६८ मधील भारत भाऊसाहेब नरवडे यांच्या शेतजमिनीतील रब्बी हंगामातील गहु पिकाची ई–पीक पाहणी केली व इतर शेतकरी बांधवांना ई – पीक पाहणी करणेबाबत मार्गदर्शन केले . यावेळी ग्राम महसूल अधिकारी वनिता इंगळे यांनी ईपीक पाहण्याची प्रक्रिया याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना दिली . यावेळी अधिकची माहिती देताना वनिता इंगळे यांनी नमूद केले की ई पीक पाहणीच्या कालावधीमध्ये कार्यक्रमांमध्ये वेळापत्रकामध्ये थोडासा बदल करण्यात आलेला आहे . नोव्हेंबर पासून सुरु होणारी ई पीक पाहणी आता एक डिसेंबरपासून सुरू करण्यात आली आहे . एक डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये शेतक–यांना आपल्या रब्बीच्या पिकांची पाहणी करता येणार आहे . त्यानंतर १६ जानेवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये सहाय्यक स्तरावरील ई पीक पाहणी केली जाणार आहे . शेतक–यांच्या माध्यमातून ई पिक पाहणी करत असताना ऊउड ॲपच्या माध्यमातून ई पिक पाहणी केली जाणार आहे . ती करत असताना तंतोतंत जिओ फेन्सिंग च्या माध्यमातून होणार असल्यामुळे शेतक–यांना स्वतःच्या गटांमध्ये उभे राहूनच ई पाहणी करावी लागणार आहे . अशा प्रकारची ई पिक पाहणी केल्यानंतर त्यातील १०% ई पिक पाहणी ही ग्राम महसूल अधिकारी यांच्या माध्यमातून तपासली जाणार आहे . अशा प्रकारच्या कार्यक्रमासह आता रब्बी हंगाम २०२४ ची ई पिक पाहणी १ डिसेंबर २०२४ पासून करण्यात येत आहे . याठिकाणी उपस्थितांशी बोलताना शेतक–यांनी वैविध्यपूर्ण पद्धतीने पिके घ्यावी , एखादा तरी जोडधंदा करावा , जेणेकरून शेतीतून उत्पन्न जरी निघाले नाही तरी जोडधंद्यातून उत्पन्नाची हमी राहू शकते , असे तहसीलदार शेळके म्हटले . यासाठी कुटुंबातील सुशिक्षित सदस्यांनी पुढाकार घ्यावा , असेही आवाहन केले .

त्यानंतर पिंपळनेर येथील वरद चरखा यांचे आशापूरक ॲग्रो गुळ पावडर कारखान्यास सर्वांनी भेट दिली . ग्रामीण भागात उद्योगांमधून स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात , शेतक–यांनीही अशाप्रकारे छोटे–मोठे उद्योग व्यवसाय सुरू करावे असे आवाहन यावेळी तहसीलदार शेळके यांनी केले .

ग्रामीण भागात सर्वसामान्य जनतेत मिसळून त्यांच्याशी संवाद साधणारा , त्यांच्या समस्या जाणून घेणारा , सोबतच विविध विभागाचे अधिकारी , कर्मचारी यांना घेऊन फिरणारा तहसीलदार म्हणून चंद्रकांत शेळके यांची ओळख निर्माण होत आहे .

अशा प्रकारे जनतेशी थेट संवाद असल्यास निश्चितच त्यांच्या अडचणींचे निराकरण होईल आणि प्रशासन वेगवान होईल यात शंका नसावी.

# प्रेरणा फाउंडेशन महाराष्ट्र सामाजिक संस्थेचा भव्य पुरस्कार सोहळा प्रेरणा रंगमंच नाट्यमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने धुमधडाक्यात साजरा.

बदलापूर(प्रतिनिधी–गुरुनाथ तिरपणकर) प्रेरणा फाउंडेशन रजि. ५६४/एफ३८७८४/बदलापूर/ठाणे/महाराष्ट्र या सामाजिक संस्थेने १५ डिसेंबर २०२४ रविवार रोजी प्रेरणा फाउंडेशनचा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा सकाळी १० ते दुपारी ३ वाजता श्री.बळालेश्वर मंगल कार्यालय, हेंद्रेपाडा बदलापूर (प). महाराष्ट्र ४२१५०३ येथे धुमधडाक्यात साजरा झाला. या कार्यक्रमाचे आयोजन प्रेरणा फाउंडेशन च्या संस्थापिका सौ. प्रेरणा वैभव कुलकर्णी यांनी केले, या कार्यक्रमाला मा.श्री.रामजीत (जीतू) गुप्ता व मा.□ड.मोहन शुक्ला, श्री.अविनाश म्हात्रे, सचिव वैभव कुलकर्णी, खजिनदार कुमार रोहन गावकर याचे विशेष सहकार्य लाभले. प्रेरणा फाउंडेशन हे एक सामाजिक संस्था असून प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहे. प्रेरणा फाऊंडेशन गेले सहा वर्ष सतत गोर गरीब लोकांना, रस्त्यावरील भटकी लोकांना, अनाथांना आधार देण्याचे काम करते. अनेक आदिवासी पाडे सुधारणे, आदिवासी गावाला रस्ता, वीज, पाणी व लाईट याची सोय, नदया, चौपाटी, एस टी डेपो, रेल्वे स्टेशन, रस्ते, ठिकठिकाणी स्वछता अभियान राबविणे, अनेक अनाथालय, वृद्धाश्रम, अनाथ रस्त्यावरील भटकी मुले यांना सहारा व सहकार्य देण्याचे काम करते. व तसेच प्रेरणा रंगमंच नाट्यमंडळ व प्रेरणा इन्स्टिटयूट अंतर्गत येणारे उपन्न सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी ह्या प्कॅन्सरग्रस्त, किडनीग्रस्त ई. मतिमंद निराधार लोकां आधार देण्यासाठी वापरतात काम करतात. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे (मुख्य तपासी अधिकारी) मा .श्री.रामजीत (जीतू) गुप्ता, (अध्यक्ष औदुंबर साहित्य मंच ) , मा.ॲड.मोहन शुक्ला,(पुणे माळीण, गाव उद्धार) मा.श्री. मच्छिन्द्रनाथ रामचंद्र झंजारे, (समाजसेविका) मा.सौ.दिपाली शिरापूरे, (शिक्षक, शैक्षणिक क्रांती), मा.श्री. प्रशांत पेंधे, (राष्ट्रीय सरपंच दक्षिण झोन अध्यक्ष) मा.श्री सेवक नागवंशी,




(सुप्रसिद्ध समाजसेवक, प्रसिद्ध पत्रकार) मा.श्री.मोहन कदम ,(बृहमुंबई होमगार्ड विभाग), मा. श्री.दिलीप नारकर, (अध्यक्ष दीनदयाल कुष्ठरोग संस्था, अध्यक्ष), मा.श्री.अविनाश म्हात्रे, (आर. एस.पी.ऑफिसर नवी मुंबई) मा सौ. प्रियंवदा तांबोटकर, (ठाणे ग्रामीण पोलीस दल १९९८) मा.श्री संजय हिरु घुडे, मा.श्री राजेश भांगे (उद्योजक), मा. श्री. राजेश भांगे), (जाणता राजा अभिनेत्री) मा. लेखा तोरसकर, (सामाजिक कार्यकर्ता) मा.श्री लोकेश पाटील या सर्व प्रमुख पाहुण्यांचा सत्कार सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी, सन्मानित निमंत्रित अतिथी व कमिटीच्या हस्ते करण्यात आला. या सोहळयाला सामाजिक, शैक्षणिक, कला क्षेत्रात सामाजिक कार्य करणा□्या संपूर्ण महाराष्ट्राच्या काना–कोप□्यातून आलेल्या सन्मानित पुरस्कार्थींना सन्मानित सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे श्री.वैभव कुलकर्णी यांनी सूत्र संचालन निभावले. सौ प्रेरणा वैभव कुलकर्णी यांनी सर्वांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच सर्व मान्यवरांनी मार्गदर्शन केले. मा.कु. समयरा हर्षल शिंदे सुंदर डान्स करून तर मा.कु. शुभ्रा तिळगुळकर ने एक छोटासा □क्ट करून सर्वांचे मनोरंजन केले. या कार्यक्रमाला कु रोहन मा.श्री. मंगेश सावंत, सौ.श्रुती आठल्ये , सदस्य सौ. गंधाली तिरपणकर, कु.शैलेश सणस, सौ.दीपाली चव्हाण, श्री.सुनील इंगळे, श्री.हर्षल शिंदे, श्री.यशवंत खोपकर, कु.परेश परब, आश्लेषा, आदिती यांचे सहकार्य लाभले. व अनिता कळसकर माधुरी भोईरकर सुंनंदा पाटील सुरज भोईर गरुनाथ तिरपणकर यासारख्या कर्तृत्वान लोक किमान १०० महिला व जवळ जवळ ३०० हुन अधिक लोक उपस्थित होते कार्यक्रमात होत्या सौ प्रेरणा कुलकर्णी यांनी सर्वांचे आभार मानले व सुंदर स्वादिस्ट भोजनाने जवळजवळ २५० हुन अधिक लोकांनी जेवणाचा आस्वाद घेतला व तसेच ५०/६० व्यक्तीचे जेवण बदलापूर येथील येथील संयोपिता अनाथाश्रम ईस्ट मध्ये अनाथा लोकांसाठी पाठविण्यात आले. व कार्यक्रमाची सांगता झाली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १८ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष व पत्रकार गुरुनाथ तिरपणकर यांना प्रेरणा फाऊंडेशनचा राज्यस्तरिय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार प्रदान.




----बदलापूर-समाजासाठी मणभर नाही तर कणभर द्यावे,या उक्ती प्रमाणे सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार गुरुनाथ तिरपणकर सेवाभावी कार्यात कार्यरत आहेत.पत्रकार संघटना,वृत्तपत्र लेखक संघ यावरही ते कार्यरत आहेत.त्यांच्या या कार्याची दखल प्रेरणा फाऊंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी यांनी घेतली.आणि नुकताच त्यांना बदलापूर येथील बल्लाळेश्वर मंगल कार्यालयात आयोजित भव्य राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यातङ्कराज्यस्तरिय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारङ्कप्रमुख पाहुण्यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.गुरुनाथ तिरपणकर हे जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.या संस्थेच्या माध्यमातून सामाजिक,सांस्कृतिक,शैक्षणिक,पुरस्कार वितरण सोहळा,वैद्यकीय अशा क्षेत्रात विविध उपक्रम राबविले आहेत.गुरुनाथ तिरपणकर हे सिटीझन वेलफेअर असोशिएशन,कोष्टी व्हीजन ट्रस्ट,अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषद,देवांग कोष्टी समाज मंडळ डोंबिवली,रत्नागिरी-सिंधुदुर्ग रहिवाशी मंडळ बदलापूर,रेल्वे प्रवासी संघटना बदलापूर,उत्कर्ष सेवा मंडळ बदलापूर,महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघ,पत्रकार उत्कर्ष समिती अशा संस्थांनवर पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.तसेच गुरुनाथ तिरपणकर हे पाक्षिक-दीपस्तंभ,सिने न्यूज रिपोर्टर-अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ,प्रतिनिधी-दै.झुंजार केसरी,सा.इंडिया सम्राट,सदस्य-मुंबई मराठी पत्रकार संघ,उपसंपादक-सा. आवाज कोकणचा,प्रतिनिधी-दै.महाराष्ट्र जीत यांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत.महाराष्ट्रातील विविध सामाजिक संस्थांशी त्यांचे घनिष्ठ संबंध आहेत.हा पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रेरणा फाऊंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी व सचिव वैभव कुलकर्णी यांचे मनस्वी आभार व्यक्त केले आहेत.गुरुनाथ तिरपणकर यांना हाङ्कराज्यस्तरिय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारङ्कमिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# पारंबी विद्यालयात डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या जीवनावर व्याख्यान संपन्न



नवीन माध्यमिक विद्यालय पारंबी ता.मुक्ताईनगर जि. जळगाव येथे नुकतेच भारताचे पहिले कृषिमंत्री तथा संविधान सभेचे सदस्य भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंती महोत्सवी वर्षानिमित्त त्यांच्या जीवन कार्यावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले याप्रसंगी मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य, अभिनेत्री डॉ. स्मितातार्इ देशमुख, प्राचार्य डॉ. सतीश तराळ , प्रा.डॉ. मंदा ताई नांदुरकर यांची याप्रसंगी उपस्थिती होती प्रसंगी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केला या कार्यक्रमाचे अध्यक्ष नवीन माध्यमिक विद्यालय पारंबीचे मुख्याध्यापक श्री एस. डी. ठाकूर सर हे होते प्रास्ताविकामध्ये विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक तथा सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख डॉ शिवचरण उज्जैनकर यांनी विद्यार्थ्यांना मान्यवरांचा परिचय करून दिला डॉ. स्मितातार्इ देशमुख या मातोश्री विमलाबाई देशमुख अमरावती येथे प्राचार्य असून त्यांनी राष्ट्रमाता जिजाऊ या चित्रपटात जिजाऊची भूमिका साकारलेली आहे तसेच भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या चित्रपटात त्यांच्या मातोश्री ची भूमिका साकारलेली आहे असे अष्टपैलू व्यक्तिमत्व असल्याचे डॉ.उज्जैनकर म्हणाले प्रसंगी ते पुढे म्हणाले की, डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंती महोत्सवी वर्षानिमित्त २४ डिसेंबर २०२३ रोजी आपल्या उज्जैनकर फाउंडेशनचे तिसरे अखिल भारतीय शिव बाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलनाचे मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती येथे आयोजित करण्यात आले होते या संमेलनाच्या स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. स्मितातार्इ देशमुख तर या संमेलनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सतीश तराळ व संयोजक प्रा. डॉ.मंदा नांदुरकर होते या सर्व सन्माननीय मान्यवरांचे विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवून स्वागत केले प्रसंगी प्राचार्य डॉ. स्मितातार्इ देशमुख यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कार्य आपल्या देशासाठी प्रत्येक नागरिकाला विद्यार्थी, पालक सर्वांना त्याचं कार्य हे प्रेरणादायी आहे त्यांनी डॉ. देशमुख पंजाबराव देशमुख यांच्या कार्याविषयी उपस्थितांना विविध उदाहरणासह मार्गदर्शन केले त्यानंतर डॉ. सतीश तराळ यांनी सुद्धा डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याविषयी मार्गदर्शन केले व प्रसंगी ह्या व्याख्यानाचे आयोजन मुक्ताईनगर तालुक्यामधील महाविद्यालय जी. जी. खडसे महाविद्यालय, जे. ई. स्कूल, मुक्ताईनगर त्याचप्रमाणे नवीन माध्यमिक विद्यालय, पारंबी तसेच श्री शिवाजी विद्यालय, वडोदा या ठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. शिवचरण उज्जैनकर यांच्या सहकार्यामुळे झाले त्याबद्दल त्यांनी डॉ.उज्जैनकर यांना त्यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांना धन्यवाद दिले प्रसंगी त्यांनी पारंबी विद्यालयाचे आभारही मानले प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री एस.डी. ठाकूर सर शिक्षक श्री एस. एस. नागे श्री रोहन आठवले आदींनी मान्यवरांचा गुलाब बुके देऊन सत्कार केला प्रसंगी शिक्षकेतर कर्मचारी श्री रघुनाथ इंगळे श्री विनायक इंगळे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. झाले आहे .

# गेवराईत १४ जानेवारीपासून भव्य कीर्तन महोत्सव

## संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या भव्य कीर्तन महोत्सवाची जय्यत तयारी सुरु

गेवराई : येथील संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने मंगळवार दि.१४ जानेवारी पासून भव्य कीर्तन महोत्सवास प्रारंभ होत असून यावर्षीचा हा द्वी-दशक ( २० ) भव्य कीर्तन महोत्सव श्री स्वामी समर्थ मंदिराजवळ, नगरपरिषद सर्व्हे.नं.६३ च्या सहन जागेवर घेण्यात येणार आहे. कीर्तन महोत्सवात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा लाभणार आहे. कीर्तन महोत्सवाचे हे २० वे वर्ष आहे. सध्या कीर्तन महोत्सवाची जोरदार तयारी चालू असून प्रतिष्ठानच्या वतीने सर्व पदाधिकारी आपले योगदान देत आहेत. गेवराईकर या भव्य कीर्तन महोत्सवाची दरवर्षी आतुरतेने वाट पाहत असतात. तरी भाविक भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे यांनी



प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

वै.गुरुवर्य संत भगवानबाबा व वै. संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त गेवराई मध्ये संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानतर्फे मागील १९ वर्षांपासून भव्य-दिव्य अशा कीर्तन महोत्सवाचे नियोजनबद्ध आयोजन केले जात आहे. यामध्ये सर्व जाती धर्मातील भाविकांचा लक्षणीय सहभाग असतो. यावर्षीच्या कीर्तन महोत्सवाचा प्रारंभ मंगळवार दि.१४ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वा.कलश पुजन व सायंकाळी ७ वा.दीपप्रज्वलन करुन ह.भ.प. समाज प्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांच्या कीर्तनाने महोत्सवाची सुरुवात होणार आहे. नित्यनेमाने रोज रात्री ८ ते १० या वेळेत कीर्तने होणार आहेत. बुधवार दि.१५ रोजी पुणे विद्यापीठचे गोल्ड मेडलिस्ट ह.भ.प.प्रा.डॉ. प्रशांत महाराज ठाकरे, गुरुवार दि.१६ रोजी केज येथील ह.भ.प. अंकिता ताई घुले, शुक्रवार दि.१७ रोजी विनोदाचार्य ह.भ.प. भाऊसाहेब महाराज पन्हाळकर, शनिवार दि.१८ रोजी रामायणाचार्य ह.भ.प.उद्धव महाराज चोले, रविवार दि.१९ रोजी श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थान, शिरूर (का.) चे मठाधिपती ह.भ.प. स्वामी विवेकानंद शास्त्री, सोमवार दि.२० रोजी परभणी येथील ह.भ.प. एकनाथ महाराज चत्तर शास्त्री, मंगळवार दि.२१ रोजी आळंदी येथील च.अ.झह.ऊ झहळश्रीहिळीीं विद्यावाचस्पती डॉ.श्री. रविदासजी महाराज शिरसाठ, बुधवार दि.२२ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत दुर्गाशक्तीगड, भिलवडे चे मठाधिपती ह.भ.प. गणेश महाराज शास्त्री यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल व नंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. तर या भव्य कीर्तन महोत्सव काळात महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रातील मान्यवर, संत महंत तसेच गायक - वादक, टाळकरी हार्मोनियम वादक, विणेकरी, चोपदार आदि गुणीजन वृंद उपस्थित राहणार आहेत.या सर्व कार्यक्रमासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे यांच्या सह प्रतिष्ठानच्या सर्वच पदाधिका-यांनी केले आहे.

# बीड जिल्ह्यात ११ महिन्यात १७४ शेतकरी आत्महत्या मात्र मदत केवळ ६५ आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना १०९ कुटुंबिय मदतीपासून वंचित ; जिल्हा प्रशासनाला गांभीर्य नाही ; मुख्यमंत्र्यांना तक्रार :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.१७ ) निसर्गाच्या लहरीपणामुळे पिकत नसलेली शेती आणि वाढते कर्ज आत्महत्येचे प्रमुख कारण मानले जाते. शेतक-यांना कधी नापिकी,कधी मालाला भाव नाही तर कधी पिकांवर पडणारी रोगराई तर कधी अतिवृष्टी यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतक-यांकडुन नैराश्येपोटी आत्महत्ये सारखं टोकाचं पाऊस उचललं जात आहे.मागील १ जानेवारी २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२४ या ११ महिन्याच्या कालावधीत बीड जिल्ह्यात १७४ शेतक-्यांनी आपले जीवन संपविले आहे. प्रशासनाकडे नोंद असलेल्या १७४ शेतकरी आत्महत्यांपैकी मदतीस पात्र १०५ तर अपात्र १७ तर प्रलंबित ५२ असुन केवळ ६५ आत्महत्याग्रस्त शेतक-्यांच्या कुटुंबियांना शासनाकडून १ लाख रूपयांची शासकीय मदत मिळाली आहे असुन १०८ कुटुंबीय मदतीपासून वंचित आहेत.संबधित प्रकरणात प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढुन उर्वरित आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना तातडीने मदत द्यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांना केली आहे.

बीड जिल्हा प्रशासनाकडे शासन दरबारी



११ महिन्यांत १७४ शेतकरी आत्महत्यांची नोंद १ जानेवारी २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२४ दरम्यान शेतकरी आत्महत्यांची शासन दरबारी नोंद खालील प्रमाणे आहे. एकुण १७४ शेतकरी आत्महत्या,पात्र १०५ , अपात्र १७ , प्रलंबित ५२ आणि मदत ६५ अशी नोंद आहे. जानेवारी महिन्यात १८ आत्महत्या त्यापैकी १४ पात्र ४ अपात्र, प्रलंबित ० ,मदत १४ तर फेब्रुवारी महिन्यात १४आत्महत्या पैकी १२ पात्र, अपात्र २, प्रलंबित ०,मदत १२ तसेच मार्च महिन्यात १२ आत्महत्या पैकी १२ पात्र अपात्र ०, प्रलंबित ०,मदत १२ तसेच एप्रिल महिन्यात आत्महत्या १३ पैकी पात्र १२ , अपात्र १ , प्रलंबित ०,मदत ९ तसेच मे महिन्यात १३ शेतकरी आत्महत्या पैकी पात्र १२ , अपात्र १ , प्रलंबित ० ,मदत ०३ तसेच जुन महिन्यात २९ आत्महत्या, पात्र २३ , अपात्र ०५ , प्रलंबित ०१ ,मदत १३ तसेच जुलै महिन्यात १४ आत्महत्या पैकी पात्र ०८ , अपात्र ०३ , प्रलंबित ०३ ,मदत ०२ तसेच ऑगस्ट महिन्यात १४ आत्महत्या पैकी पात्र ०५, अपात्र ०१, प्रलंबित ०८ ,मदत ०० तसेच सप्टेंबर महिन्यात १५ आत्महत्या पैकी ०७ पात्र, अपात्र ०, प्रलंबित ०८ ,मदत ० तसेच ऑक्टोबर महिन्यात ०९ आत्महत्या पैकी पात्र ०, अपात्र ० , प्रलंबित ०९ मदत ० तसेच नोव्हेंबर महिन्यात २३ आत्महत्या पैकी पात्र ० , अपात्र ०, प्रलंबित २३ मदत ० एकुण ११ महिन्यांत १७४ शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यापैकी १०५ मदतीस पात्र,१७ अपात्र तर ५२ प्रलंबित आणि ६५ आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना मदत देण्यात आली आहे.

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी राज्य सरकारच्या उपाययोजना प्रभावहीन :- डॉ.गणेश ढवळे ---

राज्य सरकारकडुन नैसर्गिक संकट आणि ईतर समस्यांमुळे संकटात सापडलेल्या शेतक-्यांना आधार मिळावा. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी म्हणून पिक विमा,नुकसानीचे अनुदान, विविध योजना, हमीभाव आदि उपाययोजना राबविण्यात येत असल्या तरी आत्महत्येचे सत्र थांबताना दिसुन येत नाही. सरकारच्या उपाययोजना प्रभावहीन असल्याचे दिसून येते.शासनाकडून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना दिली जाणारी १ लाख रुपयांची मदत सुद्धा वेळेवर दिली जात नाही हे अतिशय खेदजनक असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

जिल्हा प्रशासना कागदी घोडे नाचवण्यातच व्यस्त त्यांना शेतकरी आत्महत्यांचे गांभीर्य नाही :- डॉ.गणेश ढवळे

--

७ ऑक्टोबर रोजी बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतक=्यांच्या कुटुंबियांना तातडीने शासकीय मदत मिळावी यासाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले होते. त्याअनुषंगाने दि.१० ऑक्टोबर रोजी नरेंद्र कुलकर्णी तहसीलदार महसूल -२ जिल्हा दंडाधिकारी कार्यालय बीड यांनी आंदोलनाच्या अनुषंगाने नैसर्गिक आपत्ती विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांना निवेदनातील नमुद मुद्यांबाबत नियमानुसार उचित कार्यवाही करून केलेल्या कार्यवाही बाबत अर्जदार यांना अवगत करावे असे लेखी पत्रक काढले मात्र ऑक्टोबर महिन्यात ०९ आणि नोव्हेंबर महिन्यात २३ शेतकरी आत्महत्या होऊन दोन्ही महिन्यांतील एकुण ३२ प्रकरणे प्रलंबित आहेत.त्यामुळे एकंदरीतच जिल्हा प्रशासनाला शेतकरी आत्महत्यांचे गांभीर्य नसुन केवळ कागदी घोडे नाचवण्यात प्रशासन मग्न असल्याची संतापजनक प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# शिवाजी सावंत लिखित छावा जेंव्हा जेंव्हा वाचायला घेतो तेंव्हा तेंव्हा त्यामध्ये संभाजी महाराजांच्या नशिबी आलेला एक प्रसंग नेहमीच डोळ्याच्या कपारीत आसवं दाटवतो..!

शिवाजी सावंत लिखित छावा जेंव्हा जेंव्हा वाचायला घेतो तेंव्हा तेंव्हा त्यामध्ये संभाजी महाराजांच्या नशिबी आलेला एक प्रसंग नेहमीच डोळ्याच्या कपारीत आसवं दाटवतो..! सईबाई म्हणजे बाळ शंभूच्या आई. सईबाई आपल्या पदराला मरण बांधून रायगडाच्या उंबरठयात पडल्या होत्या. शिवाजी महाराजांच्या सर्वच राण्या त्यांच्या अवतीभोवती वेढा करून डोळ्यात आसवं घेऊन तोंडाला पदराचा बोळा लावत शांत उभ्या होत्या. सव्वा दोन वर्षाचा




शंभू बाळ आपल्या डोळ्याच्या कडा ओल्या करत वेदनेत नीपचीप पडलेल्या आपल्या आईला रडवेल्या चेह-याने न्याहाळत होता.. सईबाईने शंभूबाळाचा हात धरत डोळे मिटून कण्हत मंचक धरले होते. हिमालयाच्या कर्तुत्वाच्या मां - जिजाऊ देवाचा धावा करत देव्हा-यात हात जोडत शांत उभ्या होत्या. अचानक सईबाईचा तो निष्प्राण हात शंभू बाळाच्या हातून निसटून मंचकावर निसटला. महालात एकच आक्रोश उठला. त्या आवाजाने रायगडाच्या भिंतीना सरसरून घाम फुटला. आऊ आऊ म्हणत पडलेला हात दोन वर्षाच्या शंभूबाळाने अलगद उचलत आपल्या छाताडाला लावला. आऊ उठा ना, आऊऊ उ......अनब अश्रू गाळीत शंभू आक्रोश करू लागला. आऊचा हात सोडत शंभू जिजाबाईना बिलगले. आपल्या प्राणप्रिय साईबाईनी रायगडावर प्राण सोडला ही बातमी कळताच महाराजांनी आपले डोळे मिटले अनब अपार वेदना सहन करत महाराज प्रतापगडावरून रायगडावर पोहोचले. जळत्या चितेसमोर शिवाजी महाराज होरपळून निघत होते. बजाजीमामांनी शंभूचे मुंडण केले. पोरवयाच्या शंभूबाळाची चर्या अजूनच पोरकी दिसू लागली. मुंडण केलेल्या शंभूबाळाला महाराज महालात बसले होते एक हात शंभूच्या पाठीवर तर दुसरा हात छातीवरच्या कवड्यामाळेवरून फिरत होता. रडवेल्या शंभूने विचारलं, आबा आऊ कुठंय,? त्या प्रश्नाने महाराज थरथरले. शंभूबाळकडे बघणा-या महाराजांची घालमेल झाली. अनब पाठीवरून फिरणारे हात तसेच निशब्द फिरत राहिले.

अनामिक

# अद्यावत मूलभूत व्यवस्था व सोयी सुविधांसह माळेगाव यात्रा यावर्षी अधिक संस्मरणीय होईल -सिईओ मीनल करनवाल

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : महाराष्ट्रातील महत्वपूर्ण तसेच दक्षिण भारतात प्रसिध्द असलेली असलेल्या माळेगाव यात्रेला यंदाही संस्मरणीय ठरविण्यासाठी जिल्हा प्रशासन कामाला लागले आहे. यंदा अधिक प्राथमिक व मुलभूत सुविधा उपलब्ध केल्या जातील. या यात्रेचे औचित्य, महत्व आणि परंपरेला जोपासण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत पूर्ण प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मीनल करनवाल यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या यशंतवराव चव्हाण सभागृहात माळेगाव यात्रा पूर्वतयारी संदर्भात पत्रकार परिषद घेण्यात आली, त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा जाधव-कापसे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पाटील, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नारायण मिसाळ, समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात, जलसंधार विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक भोजराज, सहाय्यक जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी सुनील गिरी, नरेगाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके, प्रभारी कृषी विकास अधिकारी सचिन कपाळे, शिक्षणाधिकारी योजना दिलीप बनसोडे, प्रभारी कार्यकारी अभियंता बांधकाम संजय शिंदे, विशाल चोपडे, आदींची यावेळी उपस्थिती होती

दिनांक २९ डिसेंबर २०२४ ते २ जानेवारी २०२५ या पाच दिवसाच्या कालावधीमध्ये माळेगाव यात्रा असेल. २९ डिसेंबर रोजी देवसवारी आणि पालखी पुजनाने यात्रेची सुरुवात होणार आहे. पाच दिवसांमध्ये शेतक-यांसाठी भव्य कृषी व पशु प्रदर्शन असेल. कृषिनिष्ठ शेतक-यांचा सत्कार, अश्व, श्वान, कुकूट प्रदर्शन व विविध स्पर्धेचे उद्घाटन, कुस्त्यांची दंगल, पारंपारीक लोककला महोत्सव, महिला आरोग्य शिबिर तसेच शेवटच्या दिवशी लावणी महोत्सव प्रमुख आकर्षण ठरणार आहे.



कुस्ती दंगल व लोककला महोत्सव: पारंपरिक कलेला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

यंदाची यात्रा प्लास्टिकमुक्त यात्रा करण्यावर भर असेल. कचरा व्यवस्थापनासाठी ट्रॅक्टर, हॉटेल व खानावळांसाठी डस्टबिन्स ठेवण्यात येतील. मंदिर परिसरात प्लास्टिक मुक्तीसाठी जनजागृती आणि महिला बचत गटांकडून कापडी पिशव्यांचे स्टॉल्स उभारले जातील. ॲम्बुलन्स आणि रुग्णवाहनासाठी बाईक सेवा सुरू करण्यात येणार आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जात असून पोलीस प्रशासनाच्या मदतीने चोख बंदोबस्त ठेवला जाणार आहे. मागील वर्षी तलावाच्या ५० टक्के पाय-यांचे काम पूर्ण झाले होते, यंदा उर्वरित पाय-यांसह पालखीसाठी ओटा तयार केला जाईल. रस्ते मोकळे ठेवून छोटे व्यापारी एकत्रितपणे ठराविक जागेवर दुकाने लावू शकतील, असे जिल्हा परिषदेने नियोजन केले असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी सांगीतले आहे.


जिल्हा परिषदेने महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, पोलीस प्रशासन, अन्न व औषध प्रशासन, अग्निशमन, राज्य उत्पादन शुल्क, बीसएसएनएल, राज्य परिवहन महामंडळ, देवस्थान समिती आणि अन्य विभागांच्या समन्वयाने यात्रा यशस्वी करण्यासाठी तयारी सुरू केली असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी सांगीतले. यात्रेतील प्रत्येक भाविकाला सुरक्षित आणि सुविधा-संपन्न वातावरण देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही त्या म्हणाल्या. जिल्हा परिषदे कडून होणा-या या उपायोजनेत व सुविधांमध्ये नागरिकांच्या सक्रिय सहभागाची अपेक्षा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिका-यांनी केली आहे. प्रत्येक नागरिकांनी या ठिकाणी स्वच्छता राहण्यासाठी जागरूक असावे तसेच सहकार्य करावे, विद्यार्थी स्वयंसेवक व यात्रेकरूंनी देखील यात्रेमध्ये शासनाने निर्माण केलेल्या सोयी सुविधांचा उपयोग घ्यावा तसेच स्वच्छता व शांतता सुव्यवस्था राखण्यासाठी मदत करावी असे आवाहनही त्यांनी केले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १८ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने छगन भुजबळ यांच्यावर अन्याय केला, रोहिणी खडसे यांचा आरोप

## त्यांना मंत्रिपद नक्की मिळेल, असं प्रत्येकाला वाटत असताना, त्यांना दाबून इतरांना मंत्रीपद दिलं

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मंत्रिपद न मिळाल्याने ते नाराज झाले आहेत. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या रोहणी खडसे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर टीका केली आहे. ङ्गज्यांच्या नेतृत्व त्यांनी पक्षाच्या निवडणुका लढविल्या आहे त्यांना कुठेतरी आज डावलून दुस□्या लोकांना संधी देण्याचे काम पक्षाने केलेलं दिसतंय. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी त्यांच्या पक्षासाठी जी काही भूमिका असेल ती त्यांनी मांडली. ते पक्षाचे पूर्ण नेतृत्व करत समोर गेले. ज्येष्ठ नेता म्हणून ओबीसी नेता म्हणून त्यांनी या निवडणुकीमध्ये म हत्त्वाची भूमिका निभावली. त्यामुळे त्यांना मंत्रिपद नक्की मिळेल, असं प्रत्येकाला वाटत असताना आणि त्यांना दाबून इतरांना मंत्रीपद दिलेला आहे. कुठेतरी त्यांच्यावर अन्याय केलेला आहे. कारण निवडणुकीमध्ये त्यांचा वापर केला आणि नंतर त्यांना मंत्रीपदापासून डावललं हे चुकीचंच आहे. तसेच माजी मंत्री अनिल पाटलांनी अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीचं जळगावात नेतृत्व केलेलं आहे. तरी त्यांना मंत्रिपद दिले नाही. हा कुठेतरी त्यांच्यावरती अन्यायच आहेङ्ख, असं रोहिणी खडसे म्हणाल्या आहेत. रोहिणी खडसे यांनी यावेळी खातेवाटपावरही टीका केली. ङ्गत्यांच्या स्वतःच्या भानगडी एवढ्या चाललेल्या आहेत यांना मलिदा गँग असे म्हणता येईल. कुणाला कुठलं चांगलं मलिदा खाण्यासारखं खातं मिळेल यासाठी यांच्या भानगडी चाललेल्या आहे.

### रोहिणी खडसे यांची परभणीच्या घटनेवर प्रतिक्रिया

यावेळी रोहिणी खडसे यांनी परभणीच्या घटनेवर प्रतिक्रिया दिली. ङ्गपरभणीमधील घटना ही निषेधार्थ आहे. जी काही घटना घडलेली आहे त्या घटनेसंदर्भात सरकारने योग्य ती कारवाई करावी. तेथील लोकांना एक सुरक्षित वातावरण देण्यासाठी आणि तेथील लोकांना न्याय देण्याची भूमिका लवकर त्यांनी घेणे अपेक्षित आहे. सरकार त्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात निष्काळजीपणा दाखवत आहे आणि विलंब या सगळ्या गोष्टींमध्ये होत आहे. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये एक अस्वस्थता पाहायला मिळत आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दलित समाजाला असं कुठेतरी वाटत आहे की आपल्यावरती कुठे अन्याय होत आहे का? अनेक ठिकाणी त्यांची आंदोलन सुरू आहेत आणि सरकार त्यांना विश्वास द्यायला कुठेतरी कमी पडत आहेङ्ख, अशी टीका रोहिणी खडसे यांनी केली.

# डिजिटल अरेस्ट.. कर नाही तर डर का?

आज मोबाईल आपल्या शरीराचं एक अंग आहे असं सर्वजण वागतात. यात आपल्याकडे झालेला दळणवळण क्रांतीमुळे आता ४-ऋ आणि ५-ऋ तंत्राने सर्वांचे मोबाईल आता इंटरनेट वापरण्यास सक्षम झाले आहेत. डिजिटल इंडियाची झपाट्याने वाटचाल होताना आपणास दिसत आहे. इंटरनेट अर्थात सायबर द्वारे होणा-या गुन्ह्याचे प्रमाणही सोबत वाढत आहे.

जुन्या काळात फसवणूक करण्याचे जे प्रकार होते आजही सुरू असून त्यात आता नव्याची भर पडली आहे असेच म्हणता येईल. या सर्वांवर उपाय म्हणजे कोणतेही तंत्रज्ञान वापरताना त्याची पूर्ण माहिती आपण घेतली पाहिजे आणि त्या माहितीत जर खात्री नसेल तर त्याबाबत इतरांना विचारायला पाहिजे.

आपण डिजिटल व्यवहार करताना यूपीआय चा वापर करतो. यात अधिक सुरक्षितता असावी यासाठी वन टाइम पासवर्ड अर्थात ओटीपी (जढझ) ची सुरुवात त्यासाठी करण्यात आली आहे.

अनेकांना तुमचा पासवर्ड द्या असे फोन येतात असा पासवर्ड किंवा ओटीपी कोणतीही बँक मागत नाही याची आपणास माहिती हवी.

आणखी होणारा फसवणुकीचा मोठा प्रकार म्हणजे तुमचे कार्ड ङ्गब्लॉकफ झाले आहे ते सुरू करण्यासाठी दिलेल्या लिंक वर क्लिक करा यात आपण कार्ड खरंच ब्लॉक झालं किंवा नाही याची खात्ररजमा करण्यापूर्वीच कृती करतो. जे कार्ड ङ्गब्लॉकफ झालय म्हणून संदेश आला त्यावर एखादा व्यवहार केल्यावरच कळेल की येणारा फोन चुकीचा होता. आपण लिंक डाऊनलोड करताच आपली सर्व बँकेची माहिती समोरील व्यक्ती काढून घेते आणि आपले आर्थिक नुकसान होते.

हल्ली एक नव्याने समोर आलेला यातनादायक असा फसवणुकीचा प्रकार म्हणजे ङ्गडिजिटल अरेस्टफ अर्थात इंटरनेट द्वारे अटक करण्याचा प्रकार होय यामध्ये व्यक्तीची आर्थिक नुकसान तर होतेच सोबतच मानसिक छळ देखील होतो.

याबाबत समाज माध्यमांवर मला आलेला अनुभव मी शेअर केला आहे तो खालील प्रमाणे. अचानक फोनची बेल वाजली आणि मी फोन उचलला पलीकडून करड्या आवाजात अमुक अमुक नंबर तुमचा आहे का? अशी विचारणा झाली. तुमचे आधार कार्ड वापरून मुंबईमध्ये एक सिम कार्ड वापरत आहे आणि त्यावरील म ोबाईल द्वारे अनेक महिलांना अश्लील छायाचित्रे व व्हिडिओ पाठवले आहेत अशी तक्रार आमच्या पोलीस ठाण्याला प्राप्त झाली आहे.. अर्थात समोरील व्यक्ती हिंदीतून बोलत होती म्हणून मी म्हणलं मुंबईतील पोलीस ठाणे असेल तर अधिका-यांनी मराठीत बोलायला हवे... मी त्याला तसे मराठीत बोला असे सांगितल्यानंतर मै राजेश कुमार हू और मेरा तबादला दिल्ली से मुंबई मे कुछ नही हप्ते हुआ है और मै यहा के पोलीस स्टेशन का इन्चार्ज असे सांगितले. मला एव्हाना शंका होतीच ती आता खात्रीत बदलली की हा खोटा कॉल आहे तरी पलीकडच्या बाजूने तुमच्या विरुद्ध गुन्हा आहे व तुम्हाला डिजिटल अरेस्ट करण्यात येत आहे तुम्ही व्हिडिओ कॉल ला उत्तर द्या असे सांगण्यात आले. पुढे काय होणार हे माझ्या एव्हाना लक्षात आले होते त्याम ुळे मी त्याला सरळ सांगितले जर मी मुंबईत गेल्या दीड वर्षात आलोच नाही तर मुंबईतील एखाद्या मोबाईल विक्रेत्याने सिम कार्ड माझ्या आधार कार्ड आधारे दिले कसे याबाबत आपण लोकल पोलीस ठाण्याला कळवा मी त्या पोलीस ठाण्यात जाऊन त्या अधिका-यांना भेटतो असे म्हणाल्यावर पलीकडून अधिकच जोराने व्हिडिओ कॉल लगाओ... व्हिडिओ कॉल लगाओ असे सुरू झाले त्याने सांगितलेला नंबर दरम्यानच्या काळात मी दुस-या मोबाईलवर ट्रेस केला तसेच संपूर्ण कॉलची रेकॉर्डिंग देखील दुस-या मोबाईल द्वारे व्हिडिओ रेकॉर्ड करून ठेवली व त्याला स्पष्ट बजावले मनौटंकी बंद करोफ असे म्हटल्यावर पलीकडून अर्वाच्च भाषेत शिवीगाळ होत फोन कट करण्यात आला त्यानंतर दहा मिनिटांनी मी त्या क्रमांकावर फोन लावला त्यावेळी तो फोन कार्यरत नाही असे उत्तर मला मिळाले. त्याने माझ्या आधार कार्ड वर जो नंबर वापरात आला, तो एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याकडे होता हे देखील माझ्या वैयक्तिक तपसात लक्षात आले परंतु अशाप्रकारे अनेकांना फसवले जात आहे याकरिता ही पोस्ट मी या माध्यमातून करीत आहे.

ही ती पोस्ट होती

मुळात आपणास फोन आल्यावर आपण त्यातील सत्यता आपल्या दिनचर्येशी लावून शोधावी समोरची व्यक्ती दरडावणीच्या सुरात जे आरोप करीत आहे ते कृत्य आपण खरोखरच केले का? हे स्वतःला विचारावे समोरच्याने आपली माहिती याच सायबरच्या महाजालातून काढलेली असते आणि त्याला साधन बनवून मासे गिरवायला बसतो त्याप्रम ाणे गळ टाकलेला असतो (मासे गिरवणे हा कोकणी शब्द आहे) आपण मासा म्हणून गळाला लागल्याचे जाणवल्यावर तो आपले ङ्गहातखंडेफ दाखवत पैसे उकळण्याचा प्रयत्न करतो.प्रथम लक्षात ठेवा अशी कोणतीही ङ्गडिजिटल अरेस्टफ कायद्यात नाही आणि दुसरं म्हणजे ङ्गकर नाही तर डर कशाला?फ

कोणत्याही गुन्ह्यात प्रत्यक्ष घरी जाऊन ताब्यात घेतले जाते ते देखील स्थानिक पोलिसांच्या मदतीने. याबाबत पहिले आपल्या नजीकच्या पोलीस ठाण्यात कळविले जाते. असा फोन आल्यावर आपण पोलीस ठाण्यात याची खातरजमा करू शकता.

आपण आपले आधार कार्ड अनेक ठिकाणी दाखवतो तसेच त्याची प्रत देखील अनेकदा देतो. अशा माहिती द्वारे तुमच्याबाबत इंटरनेटवर माहिती काढता येते त्यामुळे याबाबत आपण कुठे याचा वापर केला याची नोंद ठेवल्यास असे फोन खोटे आहेत, हे कळण्यास वेळ लागत नाही.

आपली चूक आपल्याला माहिती असते मात्र घाबरून गेल्याने अनेकदा समोरची व्यक्ती त्याचा गैरफायदा घेते आणि त्यात त्यांचे प्राविण्य असल्याने लोकांची हमखास फसवणूक होते. अशा प्रकारचा फोन आपणास आला तर लक्षात ठेवा आपण सायबर पोलिसांच्या १९३० या टोल फ्री क्रमांकावर सूचना द्या. पोलीस अटके संदर्भात व्हॉट्सअप किंवा इतर माध्यमातून डिजिटल अरेस्ट साठी व्हिडिओ कॉल करत नाहीत हे लक्षात घ्या व इतरांनाही सांगा आपण सुरक्षित राहण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे प्रत्येक बाबीची खात्री केल्याखेरीज कृती न करणे सावध रहा सुरक्षित रहा.

**(प्रशांत विजया अनंत दैठणकर)**
**जिल्हा माहिती अधिका बीड**
**चलभाषा क्र. ९८२३१९९४६६**

## अजित पवार , धनंजय मुंडेंचा अपमान सहन करणार नाही : गवते



बीड दि. १७ (प्रतिनिधी ) : राज्य मंत्रिमंडळात छगन भुजबळ यांना स्थान मिळाले नाही म्हणून त्यांचे समर्थक अजित पवारांच्या फोटोला जोडे मारो आंदोलन करीत आहेत, मात्र असे असेल तर आम्ही देखील जशास तसे उत्तर देऊ, अजित पवार आणि धनंजय मुंडे यांचा अपमान आम्ही सहन करणार नाही, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जिल्हा उपाध्यक्ष बबनराव गवते यांनी दिला आहे.

प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे, छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात न आल्याने छगन भुजबळ समर्थक आक्रमक झाले आहेत. भुजबळ समर्थकांनी अजित पवार यांच्या फोटोला जोडे मारो आंदोलन केले. यानंतर आता त्या विरोधात अजित पवार समर्थक देखील आक्रमकपणे समोर आले आहेत. अजित पवार, धनंजय मुंडे यांनी नेहमीच सर्वांना सोबत घेऊन राजकरण केले आहे. मात्र आज जर कोणी अजित पवार आणि धनंजय मुंडे यांची बदनामी करणार असतील, अपमान करणार असतील तर आम्ही ते सहन करणार नाही. आम्ही देखील जशास तसे उत्तर देऊ , अजित पवारांचा अपमान थांबला नाही तर आम्ही देखील भुजबळांच्या बॅनरला जोडे मारू, असे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जिल्हा उपाध्यक्ष बबनराव गवते यांनी म्हटले आहे.

## वाहनांची नवी मालिका येणार पसंती क्रमांकासाठी अर्ज करावे

बीड, दि. १७ (जि. मा. का.) :- परिवहनेत्र दूचाकी वाहनांसाठी नोंदणी मालिका चक२३इङही सद्यस्थितीत सुरू असून सदर मालिकेतील नोंदणी क्रमांकाचे वाटप संपत आलेले आहे. त्या अनुषंगाने परिवहनेत्तर दुचाकी चक२३इच ०००१ ते ९९९९ ही मालिका दिनांक ३० डिसेंबर २०२४ पासून सुरु करण्यात येणार आहे.

ज्या वाहनधारकांना पसंतीचा नोंदणी क्रमांक घ्यावायचा असेल त्यांनी आपला विहित नमुन्यातील अर्ज आकर्षक क्रमांकला लागू असलेली फीच्या रकमेचा उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बीड यांच्या नावाचा धनादेश डी.डी व आपल्या ओळखपत्राच्या व आधार कार्डच्या साक्षांकीत प्रतिसह दिनांक १७ डिसेंबर २०२४ ते २४ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी २.०० पर्यंत कॅश काउंटर खिडकी क्रमांक २ वर जमा करावा. सदर मालिकेतील आकर्षक क्रमांकाचे वाटप महाराष्ट्र मोटार वाहन नियम व परिवहन आयुक्तांचे परिपत्रिकानुसार करण्यात येईल. तसेच एकाच आकर्षक क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झालेल्या अर्जाची नोटीस दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दुपारी ४.०० वाजता प्रसिद्ध करण्यात येईल. दिनांक २७ डिसेंबर २०२४ रोजी एकपेक्षा जास्त अर्ज असलेल्या अर्जदारांनी दुपारी १.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये मूळ शुल्का व्यतिरिक्त अधिक रकमेचा धनादेश जमा केल्यानंतर त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता लिलावाची विहित कार्यपद्धती अवलंबून नोंदणी क्रमांकाचे वाटप करण्यात येईल. तरी सर्व वाहन धारकांनी,नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, स्वप्निल माने यांनी केले आहे.

# ड्रोन खरेदी अर्थसहाय्य योजनेसाठी आवाहन

बीड, दि. १७ (जि. मा. का.) :- कृषी क्षेत्रात ड्रोन (मानव विरहीत वायू यान) च्या वापरास पुरेश्या संधी असून सद्य स्थितीत त्याचा विविध पिकांच्या वाढीच्या अवस्थेत कीटक नाशके, सूक्ष्म मुलद्रव्ये, विद्राव्य खते फवारणी या बाबी व्यतिरिक्त कृषी क्षेत्राशी निगडीत इतर कामासाठी देखील वापर करता येऊ शकतो. ड्रोन वापरामुळे शेतक-यांच्या खर्चात, वेळेत व श्रमात बचत होऊन रोजगार निर्मिती होऊ शकते. त्यामुळे केंद्र शासन पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उपअभियान या योजने अंतर्गत ड्रोन या घटकाचा समावेश करण्यात आलेला आहे.

सन २०२४-२५ साठी कृषी यांत्रिकीकरण उपअभियान अंतर्गत ड्रोन खरेदीसाठी अर्थसहाय्य या घटकासाठी १०० ड्रोनचा म हाराष्ट्र राज्य साठी वार्षिक कृती आराखडा मंजूर करण्यात आलेला असून त्यासाठी शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था तसेच कृषी व तत्सम पदवीधर लाभार्थी यांना अर्ज करता येतो.

शेतकरी/संस्था/कंपनी/पदवीधर अनुदान मर्यादा शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था इ. ४० टक्के अनुदान रक्कम ४.०० लाख मार्गदर्शक सूचनेनुसार किसान ड्रोन व त्याचे संलग्न जोडणी साहित्य याची जी मूळ/वास्तविक किंमत असेल त्यापैकी जे कमी असेल ते अनुदान रक्कम देय राहील.कृषी व तत्सम पदवीधर ५०टक्के अनुदान रक्कम ५.०० लाख अ.जा./अ.ज/ लहान व सिमांतिक/महिला शेतकरी ५० टक्के अनुदान रक्कम ५.०० लाख सर्वसाधारण शेतकरी ४० टक्के अनुदान रक्कम ४.०० लाख आयुक्त, कृषी यांचे निर्दे शान्वये ड्रोन या घटकासाठी ऑफलाईन अर्ज न करता इतर औजारांप्रमाणे महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन राबविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार लाभार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी म हाडीबीटी पोर्टलवर लॉगइन करून अर्ज करावेत.

कृषि यांत्रिकीकराण - मुख्य घटक - भाडे तत्वावरील सेवा सुविधा केंद्र या घटकामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यामुळे सन २०२४-२४ मध्ये ड्रोन हा घटक ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असल्यामुळे शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था व कृषी व तत्सम पदवीधर यांनी महाडीबीटी पोर्टलवर https://mahadbt.maharashtra.ov.in/Farmer या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत.

तसेच अधिक माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा व जास्तीत जास्त अर्ज सादर करून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे, , बीड यांनी केले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com